# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## सोमवार, दि. ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेले निर्णय.

| विषय | निर्णय |
|---|---|
| ०१ प्रव-अ-१७/०३०२२५<br>सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०० (५) (ग) नुसार बांधकाम समितीची सभा दि. १२.०९.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बांधकाम समितीच्या सभेमध्ये करण्यात आलेले खंड-१ मधील ठराव क्र. ब-१(१)/२४-२५ ते ब-३(११)/२४-२५, ठराव क्र. ब-५(१)/२४-२५, ठराव क्र. ब-६(१)/२४-२५ ते ब-६(९)/२४-२५, ठराव क्र. ब-७(३)/२४-२५, ब-७(११)/२४-२५ व ठराव क्र. ब-९/२४-२५ इतिवृत्तासह प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सविनय सादर. | म : १९/०३०२२५<br>दि. १२.०९.२०२४ रोजी बांधकाम समितीच्या सभेमध्ये करण्यात आलेले खंड-१ मधील ठराव क्र. ब-१(१)/२४-२५ ते ब-३(११)/२४-२५, ठराव क्र. ब-५(१)/२४-२५, ठराव क्र. ब-६(१)/२४-२५ ते ब-६(९)/२४-२५, ठराव क्र. ब-७(३)/२४-२५, ब-७(११)/२४-२५ व ठराव क्र. ब-९/२४-२५ मधील ठरावांना मान्यता देण्यात येत आहे. |
| ०२ प्रव-अ-१८/०३०२२५<br>परीक्षांच्या उत्तरपत्रिकेच्या स्कॅनप्रती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी ऑक्टों/नोव्हें २०२४ व एप्रिल/मे २०२५ या सत्रासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | म : २०/०३०२२५<br>परीक्षांच्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅनप्रती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी ऑक्टों/नोव्हें २०२४ व एप्रिल/मे २०२५ या दोन सत्रासाठी अंदाजे रु.३०,००,०००/- (रु. तीस लाख) इतका खर्च येत असुन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ०३ प्रव-अ-१९/०३०२२५<br>विद्यापीठ परिपत्रक क्र.३१६/२०२४, जा.क्र.एएन/५४१६, दि.३०/१२/२०२४ बाबत प्राप्त झालेली पत्रे/निवेदने/ईमेल इत्यादी. | म : २१/०३०२२५<br>सदर प्रस्तावावर साधक/बाधक चर्चा होऊन, सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा. |
| ०४ प्रव-अ-२०/०३०२२५<br>मेसर्स मायक्रोडेटा सिस्टिम्स पुणे, यांच्या ऑक्टोबर २०२४ सत्र परीक्षेचे परीक्षापूर्व व परीक्षेनंतर केलेल्या कामाचे देयकाबाबत. | म : २२/०३०२२५<br>मेसर्स मायक्रोडेटा सिस्टिम्स, पुणे यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ च्या पत्रान्वये ऑक्टोबर २०२४ सत्र परीक्षेच्या परीक्षापूर्व आणि परीक्षेनंतरच्या कामासाठी एकूण रु.२१,६०,५०२/-(एकवीस लाख साठ हजार पाचशे दोन रूपये) इतक्या रकमेचे सादर केलेले देयक परीक्षा सुधार व ऑटोमेशन **Exam Reform Online** या अर्थशिर्षामधून अदा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ०५ प्रव-अ-२१/०३०२२५<br>लिपीक संवर्गात गट-ड कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयाच्या पदांची मर्यादा संवर्ग संख्येच्या २५ टक्केवरुन ५० टक्केपर्यंत | म : २३/०३०२२५<br>कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ क्र.संकीर्ण-२४०१/ई-७२२४४२/ विशि-१, दिनांक |

| | |
|---|---|
| वाढविण्याकरिता गट-ड संवर्गातील मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करण्याबाबत. | १९/०१/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये विद्यापीठ आस्थापनेमधील गट-ड मधील २५ टक्के पदे निरसित करण्याबाबतचे धोरण निश्चित करुन पुढील कार्यवाही करण्यासाठी समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात येत आहे. |
| **०६ प्रव-अ-२२/०३०२२५**<br>विद्यापीठाच्या वर्धापनदिनी जीवन साधना गौरव पुरस्कारर्थींचे नामनिर्देशनाबाबत. | **म : २४/०३०२२५**<br>**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या दि. १० फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून खालील नमूद मान्यवरांना विद्यापीठाचा जीवनसाधना गौरव पुरस्कार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**<br>१. डॉ. एकनाथ वसंत चिटणीस<br>२. डॉ. शांताराम बळवंत मुजुमदार<br>३. डॉ. गो. बं. देगलूरकर<br>४. डॉ. तारा भवाळकर<br>५. डॉ. विश्वास मंडलिक<br>६. श्रीमती हेमलता बिडकर<br>७. डॉ. शिवाजीराव कदम<br>८. डॉ. संजय कुलकर्णी<br>९. डॉ. मुकुंद तापकीर<br>१०. श्री. आर. एन. शिंदे<br><br>**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या दि. १० फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून खालील नमूद मान्यवरांना विद्यापीठाचा युवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**<br>१. श्री. शुभंकर एकबोटे<br>२. श्री. सुमेधकुमार इंगळे<br>३. श्री. स्वप्नील कुसळे<br>४. श्री. संदिप कुसळकर |
| **०७ प्रव-अ-२३/०३०२२५**<br>"INSTITUT FRANÇAIS EN INDE, New Delhi" या संस्थेबरोबर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागाचा Department of Foreign Languages (SPPU) सामंजस्य कराराच्या नुतनीकरण (Renewal) करण्यास व सामंजस्य कराराच्या मसुद्यास मान्यता देणेबाबत. | **म : २५/०३०२२५**<br>**"INSTITUT FRANÇAIS EN INDE, New Delhi" या संस्थेबरोबर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागाचा Department of Foreign Languages (SPPU) सामंजस्य कराराचे नुतनीकरण (Renewal) करण्यास व सामंजस्य कराराच्या मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे.**<br>**सदर सामंजस्य करारामुळे विद्यापीठावर कुठल्याही प्रकारचे आर्थिक दायित्व येणार नाही याची दक्षता घ्यावी.** |
| **०८ प्रव-अ-२४/०३०२२५**<br>"Nitori Foundation, Japan" या संस्थेबरोबर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या Centre for Innovation, Incubation & Enterprise (SPPU) नव्याने (New) सामंजस्य करार करण्यास व सामंजस्य कराराच्या मसुद्यास मान्यता देणेबाबत. | **म : २६/०३०२२५**<br>**"Nitori Foundation, Japan" या संस्थेबरोबर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या Centre for Innovation, Incubation & Enterprise (SPPU) सामंजस्य करार नव्याने (New) करण्यास व सामंजस्य कराराच्या मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे.**<br>**सदर सामंजस्य करारामुळे विद्यापीठावर कुठल्याही प्रकारचे आर्थिक दायित्व येणार नाही याची दक्षता घ्यावी.** |
| **०९ प्रव-अ-२५/०३०२२५**<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दुबई ऑफशोअर कॅम्पस उभारणीसाठी मदत करणारे हसन चौगुले यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांच्या दुःखवट्याचा प्रस्ताव. | **म : २७/०३०२२५**<br>**हसन चौगुले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.** |

| | |
|---|---|
| १० प्रव-अ-२६/०३०२२५<br>संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक-लेखक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनाचे माजी अध्यासन प्रमुख डॉ. अशोक कामत यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांच्या दुःखवट्याचा प्रस्ताव. | म : २८/०३०२२५<br>**डॉ. अशोक कामत यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.** |

(प्रा (डॉ.) ज्योती भाकरे)
मा. प्रभारी कुलसचिव
सचिव

(प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी)
मा. कुलगुरु
अध्यक्ष